# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
## MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK

MUHS

दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004
Tel:(0253) 2539170/171/179 , Student Helpline: 0253-2539111/6659111
Website: www.muhs.ac.in, E-mail: sw@muhs.ac.in

डॉ. देवेंद्र शेषराव पाटील
एम.डी.(होमिओपॅथी)
संचालक, विद्यार्थी कल्याण

**Dr. Devendra Sheshrao Patil**
M.D. (Homoeopathy)
**Director, Student Welfare**


जा.क्र. मआविवि/वि.क./योजना/ ७८२ /२०२६ दि. ३०/०४/२०२६

प्रति,
मा. अधिष्ठाता / प्राचार्य,
इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स आयुर्वेद कॉलेज,
मानोरी ता दिंडोरी, ४२२००४
नाशिक.

विषय :- कमवा व शिका योजनेचे अनुदान आर.टी.जी.एस. केल्याबाबत...

संदर्भ :- विद्यापीठाचे परिपत्रक क्र. १३/२०२५ ; दि. २०/०६/२०२५

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयांस अनुसरुन कळविण्यात येते की, विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२५ - २०२६ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांकरीता विद्यापीठाने लागू केलेली “कमवा व शिका” योजनेसाठीचे ऑनलाईन स्वरुपात प्रस्ताव संदर्भीय परिपत्रकान्वये मागविण्यात आले आहेत. ऑनलाईन प्राप्त प्रस्तावांची छाननी केल्यानंतर योजनेच्या अटी, शर्ती व निकषांनुसार योजनेचे अनुदान, प्रति विद्यार्थी रु.२०,०००/- इतकी रक्कम मिळणेसाठी खाली नमूद केलेल्या विद्यार्थ्यांचे प्रस्ताव पात्र ठरले आहेत. यासंबंधी संदर्भीय परिपत्रकामध्ये नमुद केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून, महाविद्यालयाने साप्ताहिक सुट्टीचे दिवस वगळता प्रत्येक दिवशी फक्त दोनच तास निवडक स्वरुपाची कामे विद्यार्थ्यांना देण्यात यावी व त्या मोबदल्यात विद्यापीठातर्फे सदर अनुदान प्रति तास रु.६२.५०×२ तास × २० दिवस = रु.२,५००/- दरमहा ×०८ महिने = रु.२०,०००/- या दराने मेहनताना अदा करण्यात यावा. त्यासाठी खालील नमुद केलेल्याप्रमाणे ५ विद्यार्थ्यांकरीता व ऑडीट फी रु.१,०००/- असे विद्यापीठाचे एकत्रित अनुदान म्हणून रु.१०१०००/- इतकी महाविद्यालयाने कळविलेल्या चालु खात्यात दि. 01/05/2026 रोजी आर.टी.जी.एस. द्वारे जमा करण्यात आली आहे.

लाभार्थी विद्यार्थी

१) नागरगोजे ऋषिकेश अर्जुन

२) मकरिये मानसी सुजित

३) पाटील नचिकेत लोटन

४) कावळे अंजली पांडुरंग

५) मुंढे गणेश राजू

अ) "कमवा व शिका" योजनेचे समायोजन करण्यासाठी पुढील कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहे.

१) या योजनेअंतर्गत विद्यापीठाने कळविलेल्या पात्र विद्यार्थ्यांबाबत महाविद्यालयाच्या मुखपत्रावर पुढीलप्रमाणे मजकूर संबंधित महाविद्यालयाच्या अधिष्ठाता / प्राचार्यांमार्फत प्रमाणित करुन सदरचे प्रमाणपत्र समायोजनाकरीता देयक सादर करतेप्रसंगी सोबत जोडावे.

प्रमाणपत्र

"कमवा व शिका योजनेकरीता ____________________ (विद्यार्थ्याचे नाव) याआर्थिकदृष्टया मागासलेल्या गरिब विद्यार्थ्यास ____________________ काम देण्यात आले आहे".

महाविद्यालयाचा शिक्का                                        अधिष्ठाता / प्राचार्य यांची स्वाक्षरी

सादर प्रस्तावासोबत उक्त नमूद मजकूराचे मुळ प्रमाणपत्र जोडलेले नसल्यास ती महाविद्यालयाची तांत्रिक चूक धरली जाईल. याची नोंद घ्यावी.

२) सोबत जोडलेल्या विहित नमुन्यामध्ये, सनदी लेखापालांचे उपयोगिता प्रमाणपत्र मुळ प्रत. **(Utilization Certificate) (Original Copy)**

३) सनदी लेखापालांकडून परिक्षण केलेला रकमेचा जमा-खर्चाचा हिशोब मुळ प्रत. **(Original Copy)**

४) प्रस्तावाचे लेखा परीक्षण केलेल्या सनदी लेखापाल यांना अदा करण्यात आलेल्या रु.१,०००/- मानधनाची संबंधित सनदी लेखापालाची सही व शिक्क्यानिशी संबंधिताचा जीएसटी क्रमांक नमूद असलेल्या वैध स्वरुपाची पावतीची मूळ प्रत. (सादर केलेली पावती वैध नसल्यास सदरचा खर्च आपणाकडून वसुल करण्यात येईल)

५) योजनेअंतर्गत पात्र विद्यार्थी / विद्यार्थ्यीनीचे विद्यापीठाने विहित केलेल्या प्रो-फॉर्म मध्ये विद्यार्थीनिहाय मूळ हजेरीपत्रक समन्वयक व अधिष्ठाता / प्राचार्य यांच्याद्वारे प्रमाणित करुन पाठविण्यात यावे. **(Original Copy)**

६) योजनेत काम केलेल्या विद्यार्थ्यांना, विद्यापीठाच्या अनुदानातून देण्यात आलेल्या रक्कमेच्या धनाकर्ष अथवा धनादेशाच्या छायांकित प्रत.

७) सदर योजनेअंतर्गत या पात्र विद्यार्थी/विद्यार्थीनी यांना अदा करण्यात आलेली रक्कम जमा झाल्याची खातरजमा करणेकरीता संबंधितांच्या बॅकस्टेटमेन्टच्या पहिल्या पानावर स्वतःचे नाव व बॅकखात्याचा तपशील तसेच पासबुकच्या परिपुर्ण व स्पष्ट स्वरुपात रकमेपुढे हायलाईट केलेल्या विद्यार्थीनिहाय छायांकीत प्रती अथवा बॅकेमधुन प्रमाणित करुन दिलेले बॅकस्टेटमेन्ट सादर कराव्यात. (मोबाईलद्वारे घेतलेले स्क्रिन फोटो बॅकस्टेटमेन्ट म्हणून ग्राहय नाही)

८) सदर योजनेअंतर्गत या पात्र विद्यार्थी/विद्यार्थीनीचे महाविद्यालयाच्या बॅकखात्यामधून रक्कम वर्ग विद्यार्थ्यांना रक्कम अदायगी झाल्याची खातरजमा करणेकरीता बॅकस्टेटमेन्टच्या पहिल्या पानावर स्वतःचे नाव व बॅकखात्याचा तपशील तसेच पासबुकच्या परिपुर्ण व स्पष्ट स्वरुपात झालेल बॅकेमधुन प्रमाणित करुन दिलेले विद्यार्थीनिहाय बॅकस्टेटमेन्ट अदा करण्यात आलेल्या रक्कमे पुढे हायलाईट करुन सादर करण्यात यावे.

९) योजनेतंर्गत दिलेल्या, अनुदान रकमेच्या हिशोबाचे समायोजन करण्यासाठी वर नमुद केलेल्या सर्व कागदपत्रांची एकत्रितरित्या पुर्तता करुन, सदर पत्राच्या दिनांकापासुन, (उन्हाळी सुट्टी, हिवाळी सुट्टी वगळून किंवा विद्यार्थ्यास

अपरिहार्य कारणामुळे, अपघात झाला किंवा आजारी असल्यास विद्यार्थी काम न करु शकल्यास पुढे तेवढेच सुट्टी घेतेलेले दिवस मोजुन तेवढेच दिवस काम देण्यात यावे) आठ महिने पुर्ण झाल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत विद्यापीठास पाठविणे अनिवार्य आहे. योजनेअंतर्गत काम करण्यास इच्छूक नसणाऱ्या विद्यार्थ्यांची रक्कम त्वरित विद्यापीठास परत करावी अन्यथा सदर रक्कमेवर बॅकेच्या प्रचलीत व्याज दराप्रमाणे व्याज आकारण्यात येईल. कमवा व शिका योजना राबविली नसल्यास किंवा योजनेचे अनुदान शिल्लक राहिल्यास सदर अनुदानाची रक्कम " कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक." यांच्या नावे नाशिक येथे देय असलेल्या धनाकर्षाव्दारे विद्यापीठास परत करावी. शिल्लक राहिलेली रक्कम विद्यापीठास परत करण्यासाठी, लागणाऱ्या खर्चाच्या रक्कमेचे देयक मंजूर होणार नाही. सदर खर्च महाविद्यालयाने करावयाचा आहे.

सदर योजनेसाठीच्या लाभार्थी विद्यार्थ्यांसाठी पुढील सुचना देण्यात याव्यात.

अ) योजनेचे लाभार्थी विद्यार्थी आपल्या शैक्षणिक अध्ययनात खंड पडू देणार नाही.

ब) योजनेतील कामाचा महाविद्यालयात नोकरी/सेवेशी कोणताही संबंध रहाणार नाही.

क) लाभार्थी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील शिस्त व नियमांचे काटेकोरपणे पालन करावे.

ड) योजनेतील लाभार्थी विद्यार्थी दरवर्षी नव्याने निश्चित केले जातील, त्यासाठी विद्यार्थ्याने दरवर्षी नव्याने अर्ज करणे आवश्यक असेल.

इ) महाविद्यालयाने उपलब्ध करुन दिलेल्या कामाबाबत/सेवेबाबत तसेच आर्थिक व्यवहाराची संपूर्ण जबाबदारी महाविद्यालय व विद्यार्थी यांची असेल व त्याबाबत विद्यापीठाकडे तक्रार करता येणार नाही.

ई) लाभार्थी विद्यार्थ्याला महिन्यातील जास्तीत जास्त २० दिवस अशाप्रकारे वर्षातील जास्तीत जास्त ०८ महिने काम दयावे. त्यामुळे विद्यार्थ्याला (रु.६२.५० प्रती तास प्रमाणे) कमाल रु.२०,०००/- प्रती वर्ष एवढीच रक्कम विद्यापीठातर्फे अदा करता येईल याची नोंद घ्यावी. (रु ६२.५०×२ तास ×२० दिवस = रु. २,५००/- दरमहा ×०८ महिने = २०,०००/-) कमवा व शिका योजनेचा लाभ अंत्यत गरीब व गरजु विद्यार्थ्यांना मिळावा यासाठी मा. अधिष्ठाता/प्राचार्य यांनी योजनेचे नियमित संनियंत्रण (त्महनसंत डवदपजवतपदह) करणे आवश्यक आहे व विद्यापीठाच्या नियमांचे उल्लंघन होणार नाही. कृपया याची नोंद घ्यावयाची आहे. तसेच आर.टी.जी.एस. झाल्याची पोहोच उलट टपाली देण्यात यावी व योजनेबाबतच्या सर्व सुचनांचे तंतोतंत पालन करावे. सदर पत्राची प्रत संबधीत विद्यार्थ्यांस देण्यात यावी ही विनंती.

धन्यवाद !

संचालक
विद्यार्थी कल्याण विभाग

(टिप : सदर योजनेचा आठ महिन्याच्या कालावधी संपल्यानंतर दि.२८|०२|२०२७ पर्यत योजनेचे समायोजन करण्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात यावा.)

सोबत :

Dr. Yogeshwari Patil.

11/5/26